पुण्य नगरी
पुणे, रविवार, दि.१८ जुलै २०२१

# संत साहित्य व तंत्रज्ञानाची सांगड घालून शिक्षण द्यावे

❑ उल्हास पवार यांचे मत
❑ एमआयटी डब्ल्यूपीयूत पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेचे आयोजन

**पुणे** : भाषा ही संस्कृतीची वाहक आहे. पण इंग्रजी भाषेचा जसा प्रभाव वाढला तशा सर्व गोष्टींचा लोप होत गेला आहे. त्याचा प्रभाव हा संत साहित्यांवर झालेला दिसतो. त्यामुळेच संत साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून माणूस घडविण्याचे शिक्षण दिले गेले पाहिजे, असे मत महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय या विषयावर आयोजित तिसऱ्या सत्रात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एस.एन.पठाण हे होते. तसेच राष्ट्रीय कीर्तनकार व संतसाहित्याचे अभ्यासक ह.भ.प. चारूदत्त आफळे, सुप्रसिद्ध कवयित्री व लेखिका डॉ. पुष्पिता अवस्थी, सुप्रसिद्ध युवा कीर्तनकार भावार्थ देखणे, ज्युडी रस्ट आणि ह.भ.प.श्री चंद्रकांत वांजाळे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, डॉ. संजय उपाध्ये आणि डॉ. ज्ञानेश लिमये हे उपस्थित होते.

पवार म्हणाले, संतांनी आपल्या वांङ्मयातून लोकांचे प्रबोधन केले आहे. इंग्रजांनी १५० वर्ष राज्य केल्यामुळे आमच्यावर त्यांचा पगडा होता. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचे महत्व वाढले. एकीकडे राज्यातील मराठी शाळा बंद पडत चाललेल्या आहेत. आज सर्वच स्तरातील लोक मुलांना इंग्रजी शाळेत टाकतात हे दुर्देव आहे. त्यामुळे मुलांचा परिपूर्ण मानसिक विकास होतांना व बुध्दांक वाढतांना दिसत नाही.

चारूदत्त आफळे म्हणाले, मन, मस्तिष्क आणि मनगट ज्यातून बळकट होते तेच खरे शिक्षण आहे. स्वामी विवेकानंद यांना इंग्रजीचे उत्तम ज्ञान असल्यामुळेच आपले तत्त्वज्ञान संपूर्ण जगभर पोहोचविले. तरी पण मातृभाषा ही व्यक्तिचा आध्यात्मिक व सांस्कृतिक विकास करते.

भावार्थ देखणे म्हणाले, संतांच्या वाणीने आम्हाला विचार, विवेक करण्याची शक्ती दिली. अध्यात्मिकतेच्या माध्यमातून ज्ञान जागृती केली आहे. त्याचे विचार हे चिरंतरकाल असल्यामुळेच २१ व्या शतकात त्यांच्यावर परिषद घेत आहोत.

हभप चंद्रकांत महाराज वांजळे यांनी प्रस्ताविक केले. प्रा. डॉ. अर्चना चौधरी यांनी सूत्रसंचालन तर डॉ. शुभलक्ष्मी जोशी यांनी आभार मानले.

**पंढरी संचार**
**पंढरपूर, रविवार, दि.१८ जुलै २०२१**

# सात्विक आहाराने आत्मोन्नती होते

**डॉ.बालाजी तांबे यांचे मत**

**पुणे : जगद्गुरु तुकाराम महाराज सांगतात की, स्वकष्टातून खाल्लेले अन्न हे शरीरासाठी योग्य आहे. अन्नाचा संबंध हा मन आणि मेंदू यांच्याशी आहे. पवित्र जागेत परमेश्वराच्या नामस्मरणाने भोजन केल्यास आत्मोन्नती होते. एकंदरीतच संतांनी आरोग्यासंदर्भात जे काही सांगितले त्याचे पालन केले तर सर्वांना सुख व शांती मिळेल, असे विचार आत्मसंतुलन व्हिलेजचे संस्थापक डॉ. बालाजी तांबे यांनी व्यक्त केले.**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे' च्या तिसऱ्या दिवसाच्या 'संत आणि आरोग्य व्यवस्थापन' या विषयावरील चौथ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने हे होते. यावेळी संत भगवानबाबा वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. मुकुंद महाराज जाटदेवळेकर, ह.भ.प. बाळासाहेब बडवे, संत साहित्याचे अभ्यासक ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज माळी आणि सुप्रसिद्ध डॉक्टर विश्वास सापत्नेकर हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित होते.

तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि डॉ. संजय उपाध्ये हे उपस्थित होते.



'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'च्या 'संत आणि आरोग्य व्यवस्थापन' या विषयावरील चौथ्या सत्रात सहभागी झालेले मान्यवर.

डॉ. तात्याराव लहाने म्हणाले, उत्तम आरोग्यासाठी शुद्ध शाकाहार, व्यायाम, संतुष्टता, योग्य निद्रा, सहनशक्ती आणि चिंतामुक्त जीवन असावे. शुद्ध शाकाहार म्हणजे सात्विक अन्न जे शरीराबरोबरच मानसिक आरोग्य चांगले ठेवते. शारीरिक कष्ट व भरपूर व्यायाम केल्यानेही मन व शरीर मजबूत होते. जीवनात अल्प संतुष्टता असल्याने दुःख कधीही मिळणार नाही. तसेच शारीरिक झीज भरुन काढण्यासाठी ८ तास झोप घ्यावी. तसेच चिंतामुक्त जीवन हेच खरे जीवन आहे.

मुकुंद महाराज जाटदेवळेकर म्हणाले, संत साहित्य आणि आरोग्य यांचा जवळीक संबंध आहे. संतांनी केलेला उपदेश हा मानव कल्याणासाठीच असतो. त्यांची शिकवण ही संयमाची आहे. शरीर चांगले तर सर्व गोष्टींचा उपभोग घेऊ शकतो. त्यासाठी आरोग्य उत्तम ठेवावे. यासाठी कष्ट करून त्यावर संस्कार करावे.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि प्राणीमात्रांचा विचार आमच्या संतांनी केला आहे. संतांनी मानवी कल्याणासाठी जे तत्वज्ञान सांगितले, त्याचे अनुकरण केल्यास संपूर्ण मानव जातीला सुख-समाधान आणि शांती मिळेल. त्याचबरोबर त्यांनी मनाच्या शास्त्राचे रहस्यही संपूर्ण मानवजातीसमोर मांडले.

बाळासाहेब बडवे म्हणाले, शरीराच्या आरोग्याला खूप महत्व आहे. शरीर रोगी असेल तर त्यातील प्राणज्योतीलापण वेदना होतात. त्यामुळे मानवाची ग्रहण शक्ती क्षीण झाली आहे. अशा वेळेस संतांच्या विचारांचे संस्कार धारण करावे. उत्तम आरोग्य म्हणजे मन व बुद्धि संयमित ठेवणे आहे. शरीराबरोबरच मनाचे आरोग्य ठेवण्यासाठी ध्यान साधना करावी.

डॉ. शैलश्री हरिदास यांनी स्वागतपर भाषण केले. महेश महाराज नलावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रोहिणी काळे यांनी आभार मानले.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

दैनिक नांदेड एकजूट
नांदेड, रविवार, दि.१८ जुलै २०२१

# सात्विक आहाराने आत्मोन्नती होते : डॉ.बालाजी तांबे

पुणे : जगद्गुरू तुकाराम महाराज सांगतात की, स्वकष्टातून खाल्लेले अन्न हे शरीरासाठी योग्य आहे. अन्नाचा संबंध हा मन आणि मेंदू यांच्याशी आहे. पवित्र जागेत परमेश्वराच्या नामस्मरणाने भोजन केल्यास आत्मोन्नती होते. एकंदरीतच संतांनी आरोग्यासंदर्भात जे काही सांगितले त्याचे पालन केले तर सर्वांना सुख व शांती मिळेल.असे विचार आत्मसंतुलन व्हिलेजचे संस्थापक डॉ. बालाजी तांबे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे' च्या तिसऱ्या दिवसाच्या संत आणि आरोग्य व्यवस्थापन' या विषयावरील चौथ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने हे होते. यावेळी संत भगवानबाबा वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. मुकुंद महाराज जाटदेवळेकर, ह.भ.प. बाळासाहेब बडवे, संत साहित्याचे अभ्यासक ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज माळी आणि सुप्रसिद्ध डॉक्टर विश्वास सापत्नेकर हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित होते.

तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि डॉ. संजय उपाध्ये हे उपस्थित होते.

डॉ. बालाजी तांबे म्हणाले, समर्थ रामदास स्वामी यांनी अन्नाला पूर्ण ब्रह्म असे संबोधले आहे. वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे हा श्लोक म्हणून अन्नाचे सेवन केल्यास आपले जीवन निरोगी राहण्यास मदत होईल. त्यामुळे मेंदूत सकारात्मक भाव निर्माण होतात. तामसी अन्न हे सदैव रोग निर्मिती करतात. संतांनी उपवासाला ही महत्व दिले आहे. त्याचे कारण म्हणजे याकाळात आपली शक्ती परेश्वराचे चिंतन करण्यासाठी लावावे. यामुळे शरीरातील विषाण्य नष्ट होतात. संताच्या वाङ्‌मयाचे अध्ययन केल्यास असे दिसते की मानवाचे आरोग्य उत्तम राहिल्यास हे जग नीट चालेल, सुव्यवस्था निर्माण होईल आणि मनुष्य हा मनुष्याचा आदर करेल. चांगले कर्म झाले तरच आत्मोन्नती होईल.

डॉ. तात्याराव लहाने म्हणाले, उत्तम आरोग्यसाठी शुद्ध शाकाहार, व्यायाम, संतुष्टता, योग्य निद्रा, सहनशक्ती आणि चिंतामुक्त जीवन असावे. शुद्ध शाकाहार म्हणजे सात्विक अन्न जे शरीराबरोबरच मानसिक आरोग्य चांगले ठेवते. शारीरिक कष्ट व भरपूर व्यायाम केल्यानेही मन व शरीर मजबूत होते. जीवनात अल्प संतुष्टता असल्याने दुःख कधीही मिळणार नाही. तसेच शारीरिक झीज भरुन काढण्यासाठी ८ तास झोप घ्यावी. तसेच चिंतामुक्त जीवन हेच खरे जीवन आहे. या सर्व गोष्टींवर संतांनी आपल्या साहित्यात नोंद करून ठेवले आहे.

डॉ. विश्वास सापत्नेकर म्हणाले, संतांनी मानव सेवेची शिकवण दिली आहे. याचे पालन करून पंढरपुरच्या वारीला जाणाऱ्या वारकरण्याची वैद्यकीय सेवा करण्याचे भाग्य मला लाभले. सेवेमुळे मनाला सदैव प्रसन्नता मिळते. आज वारीमुळेच संपूर्ण

पान ४ वर >>

## सात्विक आहाराने आत्मोन्नती...

वर्षभर सत्कर्म करण्याचे बळ मिळते. सेवेसाठी एक ट्रस्ट तयार करून ५० डॉक्टरांची टीम केली आहे. त्यांच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य लाभते.

अर्जुन महाराज लाड म्हणाले, जे सर्व स्थितीत संतुष्ट असतात त्यांना संत असे म्हणतात. या संतांनीच मनाची जोपासना केली आहे. सर्व रोग हे मनातून निर्मित होते. वास्तविक शरीर रोगाचे भांडार आहे पण मन प्रसन्न असेल तर कोणत्याही रोगाचा परिणाम शरीरावर होणार नाही.तुकोबां ही म्हणतात मन प्रसन्न हे आरोग्याची गुरूकिल्ली आहे. औषधापेक्षा पथ्ये महत्वाचे आहे. संत साहित्यातून आरोग्य, विज्ञान, भौतिक व्यवहार आणि मानवाच्या जीवनातील सर्व घटकांचे विषय मांडून त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

मुकुंद महाराज जाटदेवळेकर म्हणाले, संत साहित्य आणि आरोग्य यांचा जवळीक संबध आहे. संतांनी केलेला उपदेश हा मानव कल्याणासाठीच असतो. त्यांची शिकवण ही संयमाची आहे. शरीर चांगले तर सर्व गोष्टींचा उपभोग घेऊ शकतो. त्यासाठी आरोग्य उत्तम ठेवावे. यासाठी कष्ट करून त्यावर संस्कार करावे

प्रा.डॉ. विश्वनाथ दा कराड म्हणाले,भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि प्राणीमात्रांचा विचार आमच्या संतांनी केला आहे. संतांनी मानवी कल्याणासाठी जे तत्त्वज्ञान सांगितले, त्याचे अनुकरण केल्यास संपूर्ण मानव जातीला सुख-समाधान आणि शांती मिळेल. त्याचबरोबर त्यांनी मनाच्या शास्त्राचे रहस्यही संपूर्ण मानवजातीसमोर मांडले.

बाळासाहेब बडवे म्हणाले, शरीराच्या आरोग्याला खूप महत्व आहे. शरीर रोगी असेल तर त्यातील प्राण ज्योतीलापण वेदना होतात. त्यामुळे मानवाची ग्रहण शक्ती क्षीण झाली आहे. अशा वेळेस संतांच्या विचारांचे संस्कार धारण करावे. उत्तम आरोग्य म्हणजे मन व बुद्धि संयमित ठेवणे आहे. शरीराबरोबरच मनाचे आरोग्य ठेवण्यासाठी ध्यान साधना करावी.

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज माळी म्हणाले,संत साहित्याचा अभ्यास करतांना दिसते की त्यांचा आयुर्वेदाशी मेळ आहे. वारीला जातांना विठ्ठलाचा जो गजर केल्या जातो, त्यामुळे शरीरात स्पंदने तयार होवून हृद्याचे आजार कमी होतांना दिसतात. तसेच, शुध्द बीजा पोटी फळे रसाळ गोमटी ही ओवी सांगून जाते की गर्भसंस्कार करतांना कसे संस्कार केले गेले पाहिजे. या वरून समजते की संत हे स्त्री रोग तज्ञ ही होते.डॉ. शैलश्री हरिदास यांनी स्वागतपर भाषण केले. महेश महाराज नलावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रोहिणी काळे यांनी आभार मानले.

**देशोन्नती**
**वाशिम, रविवार, दि.१८ जुलै २०२१**

# संत साहित्य व तंत्रज्ञानाची सांगड घालून शिक्षण द्यावे

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मंगरूळपीर** ■ भाषा ही संस्कृतीची वाहक आहे. पण इंग्रजी भाषेचा जसा प्रभाव वाढला तश्या सर्व गोष्टींचा लोप होत गेला आहे. त्याचा प्रभाव हा संत साहित्यांवर झालेला दिसतो. त्यामुळेच संत साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून माणूस घडविण्याचे शिक्षण दिले गेले पाहिजे.ङ्म असे मत महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास दादा पवार यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या ' भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय' या विषयावर आयोजित तिसऱ्या सत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एस.एन.पठाण हे होते. तसेच राष्ट्रीय कीर्तनकार व संतसाहित्याचे अभ्यासक ह.भ.प. चारूदत्त आफळे, सुप्रसिद्ध कवयित्री व लेखिका डॉ. पुष्पिता अवस्थी, सुप्रसिद्ध युवा कीर्तनकार भावार्थ देखणे, ज्युडी रस्ट आणि ह.भ.प.श्री चंद्रकांत वांजाळे हे उपस्थित होते. तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, डॉ. संजय

## उल्हास पवार यांचे प्रतिपादन

उपाध्ये आणि डॉ. ज्ञानेश लिमये हे उपस्थित होते. उल्हास पवार म्हणाले, संतांनी आपल्या वाङ्मयातून लोकांचे प्रबोधन केले आहे. इंग्रजांनी १५० वर्ष राज्य केल्यामुळे आमच्यावर त्यांचा पगडा होता. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचे महत्व वाढले. एकीकडे राज्यातील मराठी शाळा बंद पडत चाललेल्या आहेत. आज सर्वच स्तरातील लोक मुलांना इंग्रजी शाळेत टाकतात हे दुर्दैव आहे. त्यामुळे मुलांचा परिपूर्ण मानसिक विकास होतांना व बुध्दांक वाढतांना दिसत नाही. या देशात डॉ. विजय भटकर, डॉ. वसंत गोवारीकर आणि डॉ. रघुनाथ माशेलकर हे सर्व मराठी माध्यमातून शिकूण देशाचे नाव लैकिक केले आहे. मी भाषेचा द्वेष करीत नाही तरी पण आपल्या मातृभाषेचा अभ्यास करून जगभराच्या संस्कृतीचा अभ्यास करावा. चारूदत्त आफळे म्हणाले, मन, मस्तिष्क आणि मनगट ज्यातून बळकट होते तेच खरे शिक्षण आहे. स्वामी विवेकांनद यांना इंग्रजीचे उत्तम ज्ञान असल्यामुळेच आपले तत्त्वज्ञान संपूर्ण जगभर पोहोचविले. तरी पण मातृभाषा ही व्यक्तिच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक विकास करते. मातृभाषा, राष्ट्रभाषा जपणे गरजेचे आहे आणि हे सर्व संत साहित्यातूनच होऊ शकते. त्यासाठी शिक्षण संस्थेची जवाबदारी खूप मोठी आहे. इंग्रजी भाषेमुळे आपले खच्चीकरण झाले का हा एक प्रश्न आहे पण मातृभाषेतून शिक्षण हवे आणि इंग्रजी भाषा ही व्यावहारीक असावी. भावार्थ देखणे म्हणाले, संतांच्या वाणीने आम्हाला विचार, विवेक करण्याची शक्ती दिली. अध्यात्मिकतेच्या माध्यमातून ज्ञान जागृती केली आहे. त्याचे विचार हे चिरंतरकाल असल्यामुळेच २१ व्या शतकात त्यांच्यावर परिषद घेत आहोत. ज्ञान, अनुमान प्रमाण आणि अनाकलनीय या तीन गोष्टींच्या आधारावर माणुष्य विचार करतो. डॉ. पुष्पिता अवस्थी म्हणाल्या,ङ्म मानवी मनावर पाश्चात्य संस्कृतीचा खूप मोठा प्रभाव पडला आहे. त्यापासून परावृत्त होण्यासाठी संतांच्या साहित्यांचा आधार घ्यावा लागेल. हिंसेने ग्रस्त झालेल्या संपूर्ण विश्वाला संतांचे विचारच तारू शकतील. यासाठी देशातील प्रत्येक विद्यापीठांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना संत साहित्याचे ज्ञान देणे ही काळाची गरज आहे. डॉ. एस.एन.पठाण म्हणाले, आम्ही इंग्रजाच्या शिक्षणाची कॉपी केली आहे. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे असे सतत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असे. संत तुकाराम महाराज यांनी सतत समाज जागृतीचे कार्य केले आहे. रुढी व परंपरा त्यांना तड देण्याचे कार्य संतांनी केले आहे. आजचा भारत हा युवा पिढीच्या हातात सुरक्षित आहे. त्यांनी भारतीय संस्कृतीची नाळ जपली आहे. यावेळी बेल्जियमच्या ज्युडी रस्ट यांनी संत ज्ञानेश्वरांचे विचार आणि वारकरी संप्रदायातील तत्वज्ञान सांगितले. येणाऱ्या काळात विश्वशांतीसाठी व मानव जीवन सुखी होण्यासाठी ज्ञानेश्वरांचे विचारच तारू शकतील असे ही त्या म्हणाल्या. संत साहित्याचे गाढे अभ्यासक हभप चंद्रकांत महाराज वांजळे यांनी प्रस्ताविक केले.प्रा. डॉ. अर्चना चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शुभलक्ष्मी जोशी यांनी आभार मानले. (ता.प्र.)

**मराठी माध्यमातून शिकूण देशाचे नाव केले लैंकिक** - उल्हास पवार

उल्हास पवार म्हणाले, संतांनी आपल्या वांङ्मयातून लोकांचे प्रबोधन केले आहे. इंग्रजांनी १५० वर्ष राज्य केल्यामुळे आमच्यावर त्यांचा पगडा होता. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचे महत्व वाढले. एकीकडे राज्यातील मराठी शाळा बंद पडत चाललेल्या आहेत. आज सर्वच स्तरातील लोक मुलांना इंग्रजी शाळेत टाकतात हे दुर्दैव आहे. त्यामुळे मुलांचा परिपूर्ण मानसिक विकास होतांना व बुध्दांक वाढतांना दिसत नाही. या देशात डॉ. विजय भटकर, डॉ. वसंत गोवारीकर आणि डॉ. रघुनाथ माशेलकर हे सर्व मराठी माध्यमातून शिकूण देशाचे नाव लैंकिक केले आहे.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**